सहायक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा-2015
31 जानेवारी, 2016

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.

2016

Code : G07

A

# प्रश्नपुस्तिका

## पेपर I

वेळ : 1 (एक) तास | मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी | एकूण प्रश्न : 100 | एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. आणि तसेच इतर काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक | | | | | | | | — केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृति करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनाधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. 'संयुक्त स्वर' म्हणजे काय ?
   (1) एकाच स्वराला 'संयुक्त स्वर' असे म्हणतात.
   (2) दोन स्वर एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना 'संयुक्त स्वर' असे म्हणतात.
   (3) तीन स्वर एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना 'संयुक्त स्वर' असे म्हणतात.
   (4) एक स्वर व एक व्यंजन एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना 'संयुक्त स्वर' असे म्हणतात.

---

2. 'क्ष्, ज्ञ्' यांना कोणती व्यंजने म्हणून ओळखले जाते ?
   (1) संयुक्त व्यंजने (2) व्यंजने
   (3) कठोर व्यंजने (4) मृदू व्यंजने

---

3. 'दुहेरी अवतरणचिन्ह' या विरामचिन्हाचा वापर लेखनात कधी करतात ?
   (1) उत्कट भावना व्यक्त करताना...
   (2) बोलता बोलता विचारमालिका तुटल्यास...
   (3) बोलणाऱ्याच्या तोंडातील शब्द दाखविण्याकरिता...
   (4) स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास

---

4. काळाचे मुख्य प्रकार किती आहेत ?
   (1) एक (2) दोन
   (3) तीन (4) चार

---

5. "मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा." या वाक्यातील क्रियापद कसे आहे ?
   (1) स्वार्थ (2) आज्ञार्थ
   (3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

---

6. सिनेमाच्या कथा लिहिणारा...
   (1) लेखक (2) नाटककार
   (3) कथाकार (4) पटकथालेखक

---

7. 'Seasoned Journalist' या इंग्रजी वृत्तपत्र विद्या क्षेत्रातील पारिभाषिक संज्ञेसाठी मराठी पारिभाषिक संज्ञा सांगा.
   (1) पत्रकार (2) मुक्त पत्रकार
   (3) बातमीदार (4) अनुभवी पत्रकार

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

8. 'Obituary Column' या इंग्रजी वृत्तपत्र विद्या क्षेत्रातील पारिभाषिक संज्ञेसाठी मराठी पारिभाषिक संज्ञा सांगा.
   (1) निधनवार्ता स्तंभ (2) स्तंभ लेख
   (3) क्रीडा स्तंभ (4) संपादकीय

9. 'आकाशाला गवसणी घालणे' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
   (1) पृथ्वीला प्रदक्षिणा घालणे. (2) आकाशात विहार करणे.
   (3) आकाशपाताळ एक करणे. (4) शक्तीबाहेरची गोष्ट करून पाहणे.

10. पुढील वाक्यप्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.
    'काकदृष्टीने पाहणे'
    (1) वाईट दृष्टीने पाहणे (2) बारकाईने न्याहाळणे
    (3) तिरकस पाहणे (4) वाईट परिस्थिती न्याहाळणे

11. 'मला उजाडले' या विधानाचा प्रकार ओळखा.
    (1) कर्तरी (2) भावकर्तरी
    (3) कर्मकर्तरी (4) कर्मणी

12. 'अनुषंग' हा शब्द खालीलपैकी कोणत्या पोट – शब्दांतून बनला आहे ?
    (1) अनु + षांग (2) अनु + षंग
    (3) अनु + संग (4) अनु + शंग

13. 'पाणी' याअर्थी खालील कोणता शब्द वापरला जात ***नाही*** ?
    (1) उदक (2) जल
    (3) अंबू (4) पल्लव

14. 'लोकांनी आपण होऊन श्रमदान केले.' या वाक्यातील आपण या सर्वनामाचा प्रकार ओळखा.
    (1) अनुसंबंधी सर्वनाम (2) आत्मवाचक सर्वनाम
    (3) दर्शक सर्वनाम (4) सर्वनामोत्पन्न सर्वनाम

15. 'तो काय माती लिहितो.' या वाक्यातील अधोरेखित क्रियाविशेषणाचा प्रकार ओळखा.
    (1) स्थलवाचक क्रियाविशेषण (2) निषेधार्थक क्रियाविशेषण
    (3) परिमाणवाचक क्रियाविशेषण (4) स्थानिक क्रियाविशेषण

16. 'तू त्याला नाटकाला न्यायचे होतेस.' या वाक्यात कोणत्या दोन प्रयोगांचा संकर झाला आहे ?
    (1) कर्तरी – कर्मणी (2) कर्मणी – भावे
    (3) कर्तरी – भावे (4) यापैकी कुठलेही नाही

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**17.** त्याच्या बोलण्यात 'परंतु' चा वापर फार होतो. (अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.)
(1) सर्वनाम (2) नाम (3) विशेषण (4) अव्यय

**18.** पुढीलपैकी केवलप्रयोगी शब्द ओळखा.
(1) परंतु (2) शाबास (3) त्यासाठी (4) तेथे

**19.** अरेरे तो नापास झाला तो म्हणाला मी प्रेमविवाह केला सगळ्यांनी त्याचा स्वीकार केला पण. (या विधानामध्ये योग्य विरामचिन्हांचा वापर करून योग्य पर्याय निवडा.)
(1) अरेरे ! तो नापास झाला. तो म्हणाला, "मी प्रेमविवाह केला. सगळ्यांनी त्याचा स्वीकार केला. पण –"
(2) अरेरे, तो नापास झाला. तो म्हणाला "मी प्रेमविवाह केला, सगळ्यांनी त्याचा स्वीकार केलापण."
(3) अरेरे ! तो नापास झाला. तो म्हणाला, "मी प्रेमविवाह केला, सगळ्यांनी त्याचा स्वीकार केलापण."
(4) "अरेरे ! तो नापास झाला" तो म्हणाला, मी प्रेमविवाह केला. सगळ्यांनी त्याचा स्वीकार केला पण –

**20.** 'तो निजत असेल' या विधानातील काळ ओळखा.
(1) अपूर्ण वर्तमानकाळ (2) वर्तमानभविष्य
(3) भूतभविष्य (4) भविष्यभविष्य

**21.** भीति, भूगोल, भगवान हे शब्द कोणत्या प्रकारातील आहेत ?
(1) तत्सम (2) तद्‌भव (3) देशी (4) परभाषीय

**22.** खालील शब्दाची वर्णरचना सांगा.
कृष्ण
(1) क् + र् + ई + ष् + ण् + अ (2) क् + ऋ + ष् + ण् + अ
(3) क् + र् + उ + ष् + ण् + अ (4) क + ऋ + ष + ण् + आ

**23.** खालील वाक्यांतील 'नकारार्थी वाक्य' कोणते ? पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा.
(1) एक हजार रुपये ही देखील मोठी रक्कम आहे.
(2) एक हजार रुपये ही मोठी रक्कम नाही का.
(3) एक हजार रुपये ही काही लहान रक्कम नव्हे.
(4) अरे व्वा, एक हजार रूपये ही मोठीच रक्कम म्हणायची.

**24.** पहिले पद प्रमुख असणाऱ्या समासास कोणता समास म्हणतात ?
(1) बहुव्रीही (2) तत्पुरुष (3) द्वंद्व (4) अव्ययीभाव

**25.** 'तुमचा मुलगा कुंभकर्णच दिसतो.' या विधानातील अधोरेखित शब्दाच्या नामाचे कार्य ओळखा.
(1) विशेषणनाम (2) सामान्यनाम (3) सर्वनाम (4) नाम



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

26. Choose the correct alternative for the blank.
He fell asleep while he ____________ .
(1) was reading (2) has been reading
(3) is reading (4) had read

27. Insert the appropriate co-ordinating conjunction in the blank space.
Hear the opinions of other men, ____________ form your own judgement.
(1) and (2) so
(3) because (4) but

28. Choose the appropriate articles.
Get ____________ pound of sugar from ______________ nearest grocer.
(1) a, a (2) a, the
(3) the, a (4) the, the

29. Which of the following are correctly explained ?
a. Call a spade a spade — to tell a plain lie
b. The clarion call — call of duty
c. Achilles' heel — small but important weakness
(1) a and b only (2) b and c only
(3) a and c only (4) a, b and c

30. Name the type of sentence.
Considering that the world is so intricate, we are not to be surprised that science has progressed slowly.
(1) Simple sentence (2) Compound sentence
(3) Simple-complex sentence (4) Complex sentence

31. The word opposite in meaning to COGNATE is
(1) Indifferent (2) Different
(3) Uncognate (4) Discognate

32. He is so clever that he cannot be easily deceived. Use 'too' and rewrite.
(1) He is too clever so he cannot be deceived.
(2) He is too clever to be deceived easily.
(3) He is clever too, that he cannot be easily deceived.
(4) He too is clever to be easily deceived.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**33.** Choose the correct alternative.

He is blind __________ one eye.

(1) in (2) with (3) of (4) from

---

**34.** Choose the correct modal auxiliary.

I've lost my ring. I __________ it in the park.

(1) must have dropped (2) can drop

(3) have to drop (4) need to drop

---

**35.** Choose the correct preposition.

He lives __________ Church Street.

(1) in (2) on (3) to (4) at

---

**36.** She is a charming girl.

Choose the correct form of exclamatory sentence from the options given.

(1) She is a charming girl ! (2) Wow ! charming girl.

(3) What a charming girl she is ! (4) What ! is she a charming girl.

---

**37.** Make the following sentence into plural form.

There is no lady teacher in our college.

(1) There is no lady teacher in our college.

(2) There are no lady teachers in our college.

(3) There are no ladies teachers in our college.

(4) There is no ladies teachers in our college.

---

**38.** Put the sentence in Indirect speech.

He said, "Bravo ! you have done well".

(1) He applauded him, saying that he had done well.

(2) He exclaimed and said you have done well.

(3) He said bravo and did well.

(4) He said to him brave to have done well.

---

**39.** Atomic energy should be used for _______ purposes.

Complete the sentence choosing the correct adjective.

(1) construction (2) constructive

(3) constructed (4) constructing



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**40.** Add a Question Tag.

You have tea for breakfast, ____________

(1) have you ?

(2) haven't you ?

(3) don't you ?

(4) do you ?

---

**41.** Mohan <u>himself</u> caught the thief.

Identify the type of pronoun underlined.

(1) Reflexive (2) Emphatic

(3) Possessive (4) Indefinite

---

**42.** Choose the correct complex sentence corresponding to the given sentence.

You pull out the plug and I'll scream.

(1) I'll scream because you pull out the plug.

(2) If you pull out the plug, I'll scream.

(3) Because you will pull out the plug, I'll scream.

(4) Since you will pull out the plug, I'll scream.

---

**43.** Pick out the correct alternative to complete the sentence.

We should __________ the orders of our elders.

(1) carry on (2) carry out

(3) carry off (4) carry away

---

**44.** Choose the correct passive form of the given sentence.

One should keep one's promises.

(1) One's promises should be keeping.

(2) Promises should be kept.

(3) Promises be kept.

(4) No promises should be broken.

---

**45.** Fill in the blanks with correct articles.

a. ___________ book you want is out of print.

b. This is ___________ best book of elementary chemistry.

(1) A, the (2) The, a

(3) The, the (4) A, a

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**Read the following passage carefully and answer the questions no. 46 to 50 given below it :**

There seems to be a general opinion in this country that Sardar Patel was rather of a harsh and rough temperament. Men call him the 'Iron Man of India'. He was, no doubt, an iron man in the sense that one could rely on him for strict and efficient administration. But as a man, to those who had the good fortune of coming into close contact with him, he was kind and considerate. At times, he even became emotional, where his personal friends and followers were concerned. However, it goes without saying that the Sardar had great skill in organizing affairs. He knew the way of picking people and putting them in their proper places. Once he judged a man and found him correct he trusted him fully and got him to do anything he wanted.

---

**46.** Sardar Patel was called the 'Iron man of India' because

(1) He was tall

(2) He was strong and tall

(3) He was strict

(4) One could rely on him for strict and efficient administration

---

**47.** People who came in close contact of Sardar Patel found him

(1) Rather harsh and of a rough temperament

(2) Kind and considerate

(3) To give good fortune

(4) None of the above

---

**48.** Sardar Patel had a great skill of

(1) Organizing affairs

(2) Getting emotional with personal friends

(3) Being kind and considerate

(4) A general opinion in the country

---

**49.** According to the passage, the best service Sardar Patel rendered to the Motherland is

(1) Being of a rough temperament

(2) Picking the right people and putting them in proper places

(3) Being close to family and friends

(4) He laid down his life

---

**50.** The phrase — putting them in their proper places — from the above passage means

(1) Providing them places

(2) Acquiring places for them

(3) Assigning them appropriate work

(4) Showing them places

---



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

51. 'जलयुक्त शिवार अभियान' या योजनेचा उद्देश

अ. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.

ब. भूजल अधिनियम अंमलबजावणी.

क. जलस्रोतांची पाणी साठवण क्षमता वाढविणे.

ड. शेतीसाठी संरक्षित पाणी.

(1) फक्त अ व ब विधाने बरोबर आहेत

(2) सर्व विधाने चुकीची आहेत

(3) फक्त ड विधान बरोबर असून इतर विधाने चुकीची आहेत

(4) सर्व विधाने बरोबर आहेत

52. इंदिरा आवास योजनेंतर्गत उपलब्ध निधीच्या किती टक्के निधी अनुसुचित जाती/जमातीसाठी राखुन ठेवण्यात येतो ?

(1) 40% (2) 60%

(3) 50% (4) 70%

53. केंद्रीय अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना कोणत्या विभागांतर्गत राबविली जाते ?

(1) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(2) आदिवासी विकास विभाग

(3) नगरविकास विभाग

(4) माहिती व तंत्रज्ञान विभाग

54. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यात गेल्या 4 वर्षात सुवर्णजयंती राजस्व अभियान राबविण्यात आले आहे. या काही नवीन लोकाभिमुख व प्रशासकीय घटकांचा समावेश करून खाली नमूद कार्यक्रम दि. 9 ऑगस्ट 2015 पासून राबविण्यात येत आहे.

(1) राजस्व अभियान (2) सुरभि अभियान

(3) सारथी अभियान (4) महाराजस्व अभियान

55. 'खावटी कर्ज योजना' कोणामार्फत राबविली जाते ?

(1) जिल्हा नियोजन समिती

(2) अल्पसंख्यांक विकास महामंडळ

(3) आदिवासी विकास महामंडळ

(4) इतर मागासवर्ग कल्याण महामंडळ

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

56. केंद्रीय मार्गनिधी योजनेंतर्गत प्रस्तावित रस्त्यांची लांबी किमान किती असणे आवश्यक आहे ?

(1) 5 कि.मी. (2) 10 कि.मी.

(3) 20 कि.मी. (4) 25 कि.मी.

---

57. दरवर्षी 27 फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिना' निमित्त दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये खालीलपैकी कोणत्या पुरस्काराचा समावेश ***नाही*** ?

(1) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार

(2) कै. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ:मय पुरस्कार

(3) महाराष्ट्रभूषण पुरस्कार

(4) श्री.पु. भागवत पुरस्कार

---

58. 'आम आदमी विमा योजने' च्या लाभार्थींमध्ये कोणाचा समावेश होतो ?

(1) ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर

(2) 2·5 एकरपेक्षा कमी बागायती शेतजमीन धारण करणारे

(3) 5 एकरपेक्षा कमी जिरायती शेतजमीन धारण करणारे

(4) वरील सर्व

---

59. 'खारभूमि विकास योजनेच्या' उद्दिष्टां मध्ये कशाचा समावेश होतो ?

(1) समुद्राच्या खाऱ्यापाण्यापासून शेतजमिनीचे संरक्षण करणे

(2) शेतीलायक जमिनीत क्षारांच्या प्रवेशास अटकाव करणे

(3) गोड्या पाण्याचे साठे पुनर्भरित करणे

(4) वरील सर्व

---

60. 2 ऑक्टोबर 2014 पासून 'निर्मल भारत अभियान' या योजनेला कोणते नाव देण्यात आले ?

(1) निर्मलग्राम पुरस्कार

(2) संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान

(3) स्वच्छ भारत मिशन

(4) वरीलपैकी नाही

---



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

61. सुकन्या योजने अंतर्गत

अ. सर्व गटातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबात जन्मणाऱ्या प्रत्येक मुलीसाठी फक्त दोन अपत्त्यापर्यंत लागू आहे.

ब. बालगृहातील अनाथ मुलींसाठी लागू आहे.

क. लाभार्थी कुटुंबांना दोन अपत्यांच्यानंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणे बंधनकारक आहे.

(1) फक्त अ व क विधाने बरोबर आहेत

(2) फक्त ब विधान बरोबर आहे

(3) सर्व विधाने बरोबर आहेत

(4) सर्व विधाने चुकीची आहेत

---

62. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत कोणकोणत्या संस्थांचा समावेश होतो ?

अ. नगरपरिषदा, नगरपंचायती

ब. नगरपरिषदा, नगरपंचायती, व ड वर्ग महानगरपालिका

क. सर्व महानगरपालिका

(1) फक्त अ

(2) फक्त ब

(3) अ व ब दोन्ही चुक

(4) वरील एकही नाही

---

63. शालेय पोषण आहार योजनेसाठी लागणाऱ्या खर्चाची विभागणी केंद्र व राज्यशासन यात कशा प्रकारे करण्यात येते ?

(1) 50% केंद्र व 50% राज्य

(2) 100% केंद्र

(3) 75% केंद्र व 25% राज्य

(4) 25% केंद्र व 75% राज्य

---

64. क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडुंचा गौरव कोणता पुरस्कार देऊन केला जातो ?

(1) संभाजी राजे क्रीडा पुरस्कार

(2) राणा प्रताप क्रीडा पुरस्कार

(3) अहिल्यादेवी होळकर क्रीडा पुरस्कार

(4) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू)

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**65.** बलात्कार/बालकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना कोणत्या योजनेंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते ?

(1) मनोधैर्य (2) सुकन्या

(3) संरक्षण (4) उज्ज्वला

---

**66.** एकात्मिक बाल संरक्षण योजना ही कोणत्या विभागाशी संबंधित आहे ?

(1) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

(2) महिला व बाल विकास विभाग

(3) सामाजिक न्याय विभाग

(4) आदिवासी विकास विभाग

---

**67.** 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या' लाभार्थींमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश आहे ?

(1) शासकीय कर्मचारी

(2) निमशासकीय कर्मचारी

(3) सर्व आयकरदाते

(4) दारिद्र्यरेषेखालील पिवळीशिधा पत्रिका धारक कुटुंबे

---

**68.** 100 हेक्टरपर्यंत लागवडी लायक क्षेत्र असलेले तलाव/बंधारे कोणत्या विभागाच्या कक्षेत येतात ?

(1) जलसंपदा विभाग (2) जलसंधारण विभाग

(3) ग्रामविकास विभाग (4) कृषी विभाग

---

**69.** मुंबई शहरातील झोपडीवासियांचे जीवनमान उंचावणे व राहणीमानाच्या दर्जात वाढ करणे या बाबींचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कोणाच्या नेतृत्वाखाली सन 1995 मध्ये समिती नेमली होती ?

(1) सुनील कुलकर्णी (2) दिनेश अफजलपुरकर

(3) जॉनी जोसेफ (4) जे.एस. सहारीया

---

**70.** महाराष्ट्र राज्यात संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान कधीपासुन सुरू करण्यात आले ?

(1) सन 2000 – 2001 (2) सन 2001 – 2002

(3) सन 2005 – 2006 (4) सन 2002 – 2003

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**71.** वीज बिलाच्या थकबाकीत सवलत देणारी योजना कोणती आहे ?

(1) वीजबिलमाफी (2) राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण

(3) कृषी संजीवनी (4) उर्जाबचत

---

**72.** 'महालक्ष्मी सरस' हे कोणत्या विभागाशी संबंधित आहे ?

(1) सामाजिक न्याय विभाग

(2) अल्पसंख्यांक विकास विभाग

(3) महिला व बालविकास विभाग

(4) ग्राम विकास विभाग

---

**73.** अलिकडे राज्याच्या समतोल प्रादेशिक विकासासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी कोणाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती ?

(1) डॉ. रघुनाथ माशेलकर (2) डॉ. अनिल काकोडकर

(3) डॉ. विजय केळकर (4) डॉ. भालचंद्र मुणगेकर

---

**74.** महाराष्ट्रात एकूण किती व्याघ्र प्रकल्प आहेत ?

(1) 4 (2) 8 (3) 6 (4) 5

---

**75.** शासनाने कोणत्या शहरांमध्ये आय.आय.आय.टी. (Indian Institute of Information Technology) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे ?

(1) मुंबई व औरंगाबाद (2) नागपूर व पुणे

(3) नाशिक व पुणे (4) मुंबई व अमरावती

---

**76.** 1857 च्या उठावाच्या परिणामाबाबत खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) ईस्ट इंडिया कंपनीची राजवट बरखास्त होऊन इंग्लंडच्या राणीची राजवट सुरू झाली.

(2) भारतीयांना लष्करात मोठी पदे देण्यात येऊ लागली.

(3) भारतीय संस्थानिकांना संस्थाने विलीन केली जाणार नाहीत, असे आश्वासन देण्यात आले.

(4) इंग्रजांची भारतावरील पकड घट्ट झाली.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**77.** 1857 च्या उठावाविषयी, हा उठाव म्हणजे – हिंदी लोकांनी आपल्या धार्मिक व राजकीय स्वातंत्र्यासाठी केलेले क्रांतियुद्ध असे मत कोणी मांडले होते ?

(1) जॉन सीले (2) न.र. फाटक

(3) आर.सी. मुजुमदार (4) स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर

---

**78.** कोणत्या कायद्यामुळे प्रांतात लेफ्टनंट गव्हर्नर व चीफ कमिशनर यांच्या ठिकाणी गव्हर्नर आणि कार्यकारी मंडळ निर्माण करण्यात आले ?

(1) मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा

(2) मॉट-फर्ड सुधारणा कायदा

(3) 1935 चा प्रांतिक स्वायत्तता कायदा

(4) वेव्हेल योजना

---

**79.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | फिरोजशहा मेहता | I. | ज्ञानप्रसारक सभेत गुजराती भाषिक विद्यार्थ्यांना विनामुल्य शिक्षण |
| ब. | दादाभाई नवरोजी | II. | मुंबईचा अनभिधिक्त राजा |
| क. | गोपाळ कृष्ण गोखले | III. | मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथावर अभिप्राय लिहिण्याचे काम |
| ड. | महादेव गोविंद रानडे | IV. | अँग्लो इंडियन पत्रकारांच्या वृत्तपत्रात यांचा उल्लेख 'ग्लॅडस्टन' असा होई |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | I | II | III | IV |
| (3) | II | III | I | IV |
| (4) | IV | III | II | I |

---

**80.** ब्रिटिशांच्या धोरणांचा भारतातील आर्थिक जीवनावर पुढीलपैकी कोणता प्रभाव झाला नव्हता ?

अ. शेतीचे व्यापारीकरण

ब. अन्नाचा तुटवडा

क. रोखीत महसूल न भरता नगदी पिकात भरण्याची मुभा

ड. शेतीवरील बोजा कमी झाला

(1) अ, ब, क आणि ड (2) फक्त अ आणि ब

(3) फक्त क आणि ड (4) फक्त ब आणि ड



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**81.** अ. 1951 साली मुंबई राज्यात, उत्तर सातारा आणि दक्षिण सातारा ह्या जिल्ह्यांचा समावेश होता.

ब. 1956 साली द्विभाषिक मुंबई राज्यातील, दक्षिण साताऱ्याचे नामांतर सांगली जिल्हा असे झालेले दिसते.

(1) अ आणि ब दोन्ही बरोबर

(2) अ बरोबर ब चूक

(3) अ चूक ब बरोबर

(4) अ आणि ब चूक

---

**82.** भारतात कर्कवृत्त खालीलपैकी कोणत्या राज्यातून जात *नाही* ?

(1) गुजरात (2) राजस्थान

(3) झारखंड (4) ओरिसा

---

**83.** अ. 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची नागरी लोकसंख्या जास्त असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे, पुणे, नागपूर, सोलापूर ह्या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

ब. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची नागरी लोकसंख्या कमी असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये अनुक्रमे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व नंदुरबार ह्या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

(1) अ आणि ब बरोबर

(2) अ बरोबर ब चूक

(3) अ चूक ब बरोबर

(4) अ आणि ब चूक

---

**84.** क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात ______ क्रमांक लागतो.

(1) पहिला (2) चौथा

(3) सातवा (4) अकरावा

---

**85.** पाल्कची सामुद्रधुनी भारताला ______ या देशापासून वेगळी करते.

(1) पाकिस्तान

(2) चीन

(3) श्रीलंका

(4) यापैकी कुठलेही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

86. खेळातील सर्वोत्कृष्ट राजीव गांधी खेळ रत्न पुरस्कार 2015 मध्ये खालीलपैकी कोणत्या खेळाडुला प्रदान करण्यात आला ?

(1) साइना नेहवाल (2) मेरी कॉम

(3) सानिया मिर्झा (4) महेंद्रसिंग धोनी

87. 3, 4 व 5 एप्रिल 2015 रोजी घुमान (पंजाब) येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) फ.मु. शिंदे (2) डॉ. सदानंद मोरे

(3) नागनाथ कोत्तापल्ले (4) उत्तम कांबळे

88. ब्राम्होस क्षेपणास्त्राबाबत कोणते/कोणती विधान/विधाने सत्य आहे/आहेत ते सांगा ?

अ. हे क्षेपणास्त्र भारत आणि रशियाच्या संयुक्त प्रयत्नातून निर्माण झाले आहे.

ब. या क्षेपणास्त्राचे नाव हे भारतीय नदी ब्रम्हपुत्र आणि रशियन नदी मॉस्कोवा यांच्या नावापासून दिले गेले आहे.

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) अ आणि ब दोन्हीही (4) दोन्हीही नाही

89. सध्या भारताच्या मुख्य निर्वाचन आयुक्तपदी असलेली व्यक्ती सांगा.

(1) हरीशंकर ब्रह्मा (2) नवीन चावला

(3) एस.वाय. कुरेशी (4) नसीम झैदी

90. महाराष्ट्र सरकारने स्विकारलेली 'ए.पी.जे. अब्दुलकलाम अमृत योजना' खालीलपैकी कोणत्या समूहगटासाठी आहे ?

(1) शहरी महिला (2) ग्रामीण महिला

(3) आदिवासी महिला (4) विकलांग महिला

91. खालीलपैकी कोणत्या घटनादुरुस्तीने आजच्या पंचायती राजव्यवस्थेत ग्रामसभेला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त करुन दिले ?

(1) 42 व्या (2) 44 व्या (3) 73 व्या (4) 74 व्या



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**92.** पंचायत समितीच्या सभापतीच्या संदर्भातील ***अयोग्य*** पर्याय निवडा.

अ. सभापती जिल्हा परिषदेचे पद्सिद्ध सदस्य असतात.

ब. सभापती पंचायत समितीच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवितात.

क. सभापती पंचायत समितीचे सचिव म्हणून कार्य करतात.

ड. सभापतींची नेमणूक जिल्हापरिषदे तर्फे केली जाते.

(1) ब, क आणि ड (2) क आणि ड (3) अ आणि ब (4) वरील सर्व

---

**93.** बलवंतराय मेहता समितीने मुख्यत्वे कोणत्या शिफारशी केल्या आहेत ?

अ. विकास कार्यक्रमाचे स्वरूप व विविध क्षेत्रांमधील कार्यक्रमांना अग्रक्रम.

ब. शेतीविषयक कार्यक्रमांना चालना देणे.

क. स्थानिक उपक्रमशिलतेला वाव देण्याच्या दृष्टीने सुधारणा.

ड. कार्यक्रमाच्या मूल्यमापनाची यंत्रणा.

(1) अ आणि ड (2) फक्त क (3) ब आणि ड (4) सर्व योग्य

---

**94.** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना 1993 मध्ये करण्यात आली. त्याबाबतीतील कोणती विधाने ***चुकीची*** आहेत ?

अ. आयोगाचे अध्यक्ष माजी सरन्यायाधीश असतात.

ब. आयोगात चार पदसिद्ध सदस्य असतात.

क. त्यांची नेमणूक फक्त राष्ट्रपती व पंतप्रधान करतात.

ड. यापैकी दोन सदस्य, सर्वोच्च/उच्च न्यायालयातील न्यायाधीश/निवृत्त न्यायाधीश असतात.

(1) फक्त अ (2) फक्त ब आणि ड

(3) फक्त क (4) फक्त ड

---

**95.** “उद्देशपत्रिकेत भारताचे सार्वभौम, _______ धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक असे गणराज्य निर्माण करण्याचे ठरविले आहे.” असा स्पष्ट उल्लेख आहे.

(1) लोकशाहीवादी (2) साम्यवादी

(3) समाजवादी (4) भांडवलवादी

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**96.** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये कलम ________ खाली या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरिकाला माहिती प्रकट करण्याचे किंवा पुरविण्याचे आबंधन असणार *नाही* ?

(1) 8 (1) (2) 7

(3) 9 (2) (4) 6

**97.** वीस वर्षापूर्वी घडलेल्या घटनेची माहिती देताना, जर वीस वर्षाच्या उक्त कालावधीची संगणना ज्यापासून करायची त्या तारखेच्यासंबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर कोणाचा निर्णय अंतिम राहील ?

(1) माहिती देणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्याचा

(2) मुख्य माहिती आयुक्तांचा

(3) केंद्र सरकार

(4) राज्य सरकार

**98.** माहितीचा अधिकार कायदा 2005 च्या काही तरतुदी ताबडतोब अंमलात आल्या तर उर्वरीत तरतुदी तो अधिनियम अधिनियमित झाल्यापासून कितव्या दिवशी अंमलात आल्या ?

(1) तिसाव्या (2) साठाव्या

(3) एकविसाव्या (4) एकशे विसाव्या

**99.** माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कोणत्या कलमानुसार शासनाने या अधिनियमाखाली अधिकारांचा वापर कसा करावा या संबंधी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम विकसित करणे व आयोजित करणे या बाबत उल्लेख केला आहे ?

(1) कलम 24 (2) कलम 25

(3) कलम 26 (4) कलम 27

**100.** माहिती अधिकार कायद्याच्या कोणत्या तरतूदीत माहिती मिळविण्याकरिता मागणी करण्यासंदर्भात उल्लेख केला आहे ?

(1) कलम 4

(2) कलम 5

(3) कलम 6

(4) वरीलपैकी कुठलेही नाही

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** ''अंगावर काटा उभा राहणे'' या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) अतिशय भिती वाटणे'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

SEAL

---

### कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial